## एकपेशीय

नाती ना, अमिबा सारखी असतात.
कधी, कुठे, कसा सूक्ष्म जन्म घेतात,
कधी, कुठे, कशी रूजतात,
कधी, कुठे, कशी पसरतात -
आणि कधी, कुठे, कशी संकुचित होतात
का--ही सांगता येत नाही.
प्रत्येक नात्याचा आकार वेगळा
प्रत्येक नात्याचा विकार वेगळा
प्रत्येक नात्याचा आधार वेगळा
आणि व्यवहार सुद्धा वेगळा !
म्हणून वाटते
नाती, अमिबा सारखी असतात.
का, कधी, कुठे, कशी मरूनही जातात -
का--ही सांगता येत नाही.

**©प्रीती देशपांडे**

www.meetipreeti.com